असा. क्र. ४१

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, ऑक्टोबर ९, १९९८/आश्विन १७, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.—जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हा नियोजन समितीची रचना करण्याकरिता तरतूद करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधीत किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. . . | ५९०-५९५ |

दिनांक ७ ऑक्टोबर १९९८ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ९ ऑक्टोबर १९९८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी जिल्हा पातळीवर जिल्हा नियोजन समितीची रचना करण्याकरिता तरतूद करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी व संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्याकरिता जिल्हा पातळीवर जिल्हा नियोजन समितीची रचना करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ असे म्हणावे.

(२) तो भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ६ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून भारताचे राष्ट्रपती यांनी वेळोवेळी घोषित केलेले अनुसूचित क्षेत्र वगळून, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(अ) "नागरिकांचा मागासवर्ग" म्हणजे, राज्य शासनाने इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागासवर्ग म्हणून वेळोवेळी घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गांचे भाग किंवा त्यामधील गट;

(ब) "संविधान" म्हणजे, भारताचे संविधान;

(क) "विकास योजना" म्हणजे, सर्वसाधारणपणे देशाच्या व विशेषत: राज्याच्या पंचवार्षिक योजनेमध्ये व वार्षिक योजनेमध्ये रूपरेषा देण्यात आलेली अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक, निर्माणक, आणि सेवा क्षेत्रासाठी असलेली सामाजिक—आर्थिक विकास योजना;

(ड) "जिल्हा" म्हणजे, संविधानाच्या अनुच्छेद २४३-त च्या खंड (ख) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला जिल्हा;

(ई) "जिल्ह्याचा प्रभारी मंत्री" म्हणजे जिल्ह्याचा प्रभारी मंत्री म्हणून राज्य शासनाने पदनिर्देशित केलेला मंत्री ;

(फ) "नगरपालिका" म्हणजे संविधानाच्या अनुच्छेद २४३-त च्या खंड (ड) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असणारी नगरपालिका;

(ग) "पंचायत" म्हणजे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ या अन्वये रचना केलेली ग्रामपंचायत आणि पंचायत समित्या व जिल्हा परिषदा म्हणजे, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये रचना केलेल्या पंचायत समित्या व जिल्हा परिषदा; १९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५.

(ह) "लोकसंख्या" म्हणजे, जिची संबंधित आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे अशी, लगत पूर्ववर्ती जनगणनेच्या वेळी निश्चित करण्यात आलेली लोकसंख्या;

(आय) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले;

(ज) "ग्रामीण क्षेत्र" म्हणजे जिल्ह्यातील सर्व पंचायतींचा समावेश असलेले क्षेत्र;

(के) "अनुसूचित जाती" म्हणजे, संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती असल्याचे मानण्यात येत असलेल्या जाती, वंश किंवा जनजाती किंवा अशा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यांमधील गट;

(ल) "अनुसूचित जनजाती" म्हणजे, संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती असल्याचे मानण्यात येत असलेल्या जनजाती किंवा जनजाती समूह किंवा अशा जनजाती किंवा जनजाती समूह यांचे भाग किंवा त्यातील गट.

३९७



## प्रकरण दोन

## जिल्हा नियोजन समितीची रचना व कार्ये

३. (१) जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी व संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी तीसपेक्षा कमी नसतील व पन्नासपेक्षा जास्त नसतील इतक्या सदस्यांचा समावेश असलेली एक जिल्हा नियोजन समिती असेल. जिल्हा नियोजन समितीची रचना.

(२) (एक) वीस लाखांपेक्षा अधिक नसेल इतकी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्याच्या बाबतीत या जिल्हा नियोजन समितीमध्ये तीस सदस्यांचा समावेश असेल ;

(दोन) वीस लाखांपेक्षा अधिक परंतु तीस लाखांपेक्षा अधिक नसेल इतकी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्याच्या बाबतीत या जिल्हा नियोजन समितीमध्ये चाळीस सदस्यांचा समावेश असेल; आणि

(तीन) तीस लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या जिल्ह्याच्या बाबतीत या जिल्हा नियोजन समितीमध्ये पन्नास सदस्यांचा समावेश असेल.

(३) प्रत्येक नियोजन समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

एक. पदसिद्ध सदस्य—

(अ) जिल्ह्याचा प्रभारी मंत्री ;
(ब) जिल्हा परिषदेचा अध्यक्ष ;
(क) जिल्ह्याकरिता असलेल्या संबंधित सांविधिक विकास मंडळाचा एक प्रतिनिधी ;
(ड) जिल्ह्याचा विभागीय आयुक्त ;
(ई) जिल्ह्याचा जिल्हाधिकारी ;
(फ) जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी.

दोन. नामनिर्देशित सदस्य—

राज्य शासन चाळीस सदस्य असलेल्या जिल्ह्याच्या बाबतीत पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त जिल्हा नियोजन समितीच्या कामकाजासंबंधीचे ज्ञान असलेले असे दोन सदस्य नामनिर्देशित करील आणि पन्नास सदस्य असलेल्या जिल्ह्याच्या बाबतीत असे चार सदस्य नामनिर्देशित करील.

तीन. निवडून दिलेले सदस्य—

(अ) जिल्हा नियोजन समितीमधील सदस्यांच्या एकूण संख्येच्या चार-पंचमांशापेक्षा कमी नसतील इतके सदस्य हे, जिल्ह्यातील ग्रामीण क्षेत्रांची लोकसंख्या आणि नागरी क्षेत्रांची लोकसंख्या यांच्यामधील गुणोत्तर प्रमाणात, जिल्हा पातळीवर पंचायतीच्या जिल्ह्यांमधील नगरपालिकांच्या निर्वाचित सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेले असतील.

(ब) जिल्हा नियोजन समितीवर खंड (अ) अन्वये निवडून द्यावयाचे सदस्य हे, त्या प्रयोजनाकरिता चिन्हांकित केलेल्या निर्वाचक गणातील मतदारांमधून एकल संक्रमणीय मताद्वारे निवडले जातील.

(क) सदस्यांची निवडणूक, विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाकडून, किंवा अधिकाऱ्याकडून आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीनुसार घेण्यात येईल.

चार. विशेष निमंत्रित—

जिल्हा नियोजन समितीच्या क्षेत्रामधून निवडून आलेले किंवा सामान्यपणे तेथील निवासी असलेले संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य, जिल्हा नियोजन समितीच्या सर्व बैठकींना स्थायी विशेष निमंत्रित असतील आणि त्यांना समितीच्या बैठकींच्या चर्चेमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल.

(४) जिल्ह्याचा प्रभारी मंत्री हा, जिल्हा नियोजन समितीचा अध्यक्ष असेल व त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा जिल्हा नियोजन समितीचा सदस्य-सचिव असेल.

(५) जिल्हा नियोजन समितीच्या कोणत्याही बैठकीत अध्यक्ष गैरहजर असल्यास, समितीचे सदस्य बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहण्यासाठी आपल्यातील एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करू शकतील.

जागा राखून ठेवणे. ४. (१) जिल्हा नियोजन समितीमध्ये निवडणुकीद्वारे भरण्यात यावयाच्या जागांमध्ये, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग यातील व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी पोट-कलम (२) आणि (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, विहित रीतीने जागा राखून ठेवल्या जातील.

(२) जिल्हा नियोजन समितीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांमधील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येचे, जिल्हा नियोजन समितीवर नागरी किंवा ग्रामीण क्षेत्रांतून निवडून द्यावयाच्या सदस्यांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे, जास्तीत जास्त, शक्य असेल तेथवर, नागरी किंवा ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे नागरी किंवा ग्रामीण क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल :

परंतु, अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या "एक-तृतीयांश" जागा अनुसूचित जाती किंवा यथास्थिति, अनुसूचित जमाती यांमधील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील :

परंतु आणखी असे की, राखून ठेवलेल्या जागांची संख्या केवळ दोन असेल, त्याबाबतीत दोन जागांपैकी एक जागा, अशा कोणत्याही जाती किंवा जमातीमधील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) नागरिकांच्या मागासवर्गाच्या व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागांच्या संख्येचे प्रमाण जिल्हा नियोजन समितीमध्ये निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या तीस टक्के इतके असेल :

परंतु असे की, अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येपैकी एक-तृतीयांश जागा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(४) जिल्हा नियोजन समितीमध्ये नागरी किंवा ग्रामीण क्षेत्रातील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येपैकी एक-तृतीयांश जागा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्गाच्या वर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

पदावधी व नैमित्तिक रिकामी पदे भरणे. ५. (१) नामनिर्देशित केलेल्या सदस्यांच्या पदावधी राज्य शासन, जिल्हा नियोजन समितीवर असे नामनिर्देशन करताना विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

(२) जिल्हा नियोजन समितीवर निवडून देण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी संबंधित स्थानिक प्राधिकरणामधील त्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल.

(३) नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडून देण्यात आलेल्या सदस्याला राज्य शासनाला उद्देशून व स्वतःच्या सहीनिशी त्याच्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल. राजीनामा राज्य शासनास ज्या तारखेस मिळेल त्या तारखेपासून अंमलात येईल.

(४) अशा राजीनाम्यामुळे अथवा सदस्याचा मृत्यू किंवा असमर्थता यांसारख्या इतर कोणत्याही कारणांमुळे निर्माण होणारे नैमित्तिक रिक्त पद यथास्थिति, नामनिर्देशनाद्वारे किंवा निवडणुकीद्वारे भरले जाईल :

परंतु, अशाप्रकारे नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडून दिलेला सदस्य हा, ज्याच्या जागी त्याला नामनिर्देशित केले असेल किंवा निवडून दिलेले असेल त्या सदस्याने ज्या उर्वरित अवधीपर्यंत पद धारण केले असते त्या अवधीपर्यंतच पद धारण करील.

६. राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्याला पुढील बाबतीत पदावरून काढून टाकू शकेल,— सदस्यांना काढून टाकणे.

(अ) जिल्ह्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, नगर परिषदा किंवा नगर पंचायती यांनी तयार केलेल्या योजना अथवा कार्यक्रम यांत समाविष्ट असलेल्या परियोजनांमध्ये किंवा कामामध्ये त्यांचा कोणताही आर्थिक हितसंबंध असेल तर ; किंवा

(ब) राज्यामध्ये त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींअन्वये शिक्षापात्र असलेल्या, नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल त्याला दोषी ठरविण्यात आले असेल तर ; किंवा

(क) निवडणूक विनंती अर्जाच्या न्याय चौकशीत तो भ्रष्टाचाराबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल तर.

७. जिल्हा नियोजन समितीने कामे पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल. कामे पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

८. जिल्हा नियोजन समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही एरव्ही, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल तर, केवळ त्या समितीमधील एखादे पद रिक्त असल्याच्या किंवा कोणत्याही सदस्याच्या निवडणुकीमध्ये किंवा नामनिर्देशनामध्ये कोणताही दोष असल्याच्या कारणामुळे विधिअग्राह्य ठरणार नाही. कार्यवाही योग्य व विधिग्राह्य असल्याचे गृहित धरणे.

९. जिल्हा नियोजन समितीचा अध्यक्ष, कलम ३ च्या पोट-कलम (५) अन्वये उपाध्यक्ष म्हणून निवडण्यात आलेली व्यक्ती व इतर सदस्य यांना राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील असे भत्ते मिळतील. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांचे भत्ते.

१०. राज्य शासन, आदेशाद्वारे, अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपासून खाली नमूद केलेली सर्व किंवा कोणतीही कामे जिल्हा नियोजन समितीकडे सोपवील :— जिल्हा नियोजन समितीची कामे.

(अ) जिल्ह्यामधील पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेणे आणि एकत्रित करणे व संपूर्ण जिल्ह्याकरिता विकास योजनेचा मसुदा तयार करणे ;

(ब) पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या पंचवार्षिक योजना आणि सम्यकदर्शी योजना विचारात घेणे आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी पंचवार्षिक योजना आणि सम्यकदर्शी योजना मसुद्याचे समन्वयन करणे व तो तयार करणे ;

(क) जिल्हा वार्षिक योजनेचा प्रगतीचा आढावा घेणे, आणि संनियंत्रण करणे, आणि राज्य शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर तरतुदीचे पुनर्विनियोजन करण्याची सूचना करणे ;

(ड) विकास योजनेच्या मंजूर मसुद्याची अध्यक्षामार्फत राज्य शासनाकडे शिफारस करणे ; आणि

(ई) संविधानाच्या अनुच्छेद २४३-यब च्या खंड (३) च्या तरतुदींचे अनुपालन केले जात असल्याची निश्चिती करणे.

११. राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असेल अशी कार्यकारी समितीची आणि उप-समित्यांची रचना करता येतील. कार्यकारी समिती आणि उप-समित्या यांची रचना करणे.

## प्रकरण तीन

### संकीर्ण

राज्य शासनाचे स्वीकृत निदेश. १२. राज्य शासनास वेळोवेळी, उक्त समित्यांच्या कामांसंबंधातील मार्गदर्शक तत्त्वे किंवा त्यांनी केलेले ठराव, अथवा राज्य शासनाला समित्यांच्या सहकार्याने करणे योग्य वाटेल अशी कोणतीही बाब यांच्यासंबंधात जिल्हा नियोजन समित्यांना निदेश देता येतील. असे निदेश मिळाल्यानंतर जिल्हा नियोजन समित्या त्यांचे पालन करतील.

नियम करण्याचा अधिकार. १३. (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमान्वये नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करील.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत केलेल्या, नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारांस बाध न येता राज्य शासनाला, सामान्यपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असतील, असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनांत तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील आणि अशा निर्णयाबाबतची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करतील तर, असा नियम, अशी अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. १४. या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवली तर राज्य शासनाला, प्रसंगानुसार, या अधिनियमाची उद्दिष्टे व प्रयोजने यांच्याशी विसंगत नसेल अशी, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर काढण्यात येणार नाही.